**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २९ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात अतिवृष्टीमुळं ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिक स्थलांतरित; ३ जणांचा मृत्यू.**
2. **शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीचा सरकारचा निर्धार असल्याचं पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं प्रतिपादन.**
3. **69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून धम्म लर्निंग सेंटर सारनाथचे भदंत चंदीमा थेरो राहणार उपस्थित.**
4. **'कामठी-घोरपड-लिहीगाव रस्त्यावर बांधलेल्या ७०८ पूर्णांक ६६ मीटरच्या रेल्वे उड्डाण पुलाचं गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण.**
5. **दीक्षाभूमीपासून सेवाग्राम आश्रमापर्यंतच्या संविधान सत्याग्रह पदयात्रेला तुषार गांधी यांच्या उपस्थितीत सुरुवात.**

---------------------------------

अतिवृष्टी बाधित नागरिक

यंदा राज्यात सरासरीच्या तुलनेत ११७ टक्के पाऊस झाला. अतिवृष्टीमुळं राज्यातले ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिक स्थलांतरित झाले आहेत, अशी माहिती राज्य सरकारनं दिली आहे. सर्वाधिक १३ हजारांहून अधिक नागरिक सोलापूरात स्थलांतरित झाले आहेत. तर जालन्यात साडे ८ हजार, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८ हजारांहून अधिक आणि धाराशिवमध्ये सुमारे ४ हजार नागरिक स्थलांतरित झाले आहेत. गेल्या २४ तासात पुरात वाहून गेल्यानं राज्यात ३ जणांचा मृत्यू झाला. त्यात अहिल्यानगरमध्ये २ आणि नांदेडमधल्या एका व्यक्तीचा समावेश आहे. ऱाज्यात सध्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे १८ आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे ६ पथक तैनात आहेत.

---------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यात अवकाळी पावसामुळे तब्बल ५० लाख हेक्टरवरील सोयाबीन, कपाशी, संत्रा आदी पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. ही परिस्थिती मागील ५० वर्षातील सर्वात मोठी आपत्ती आहे. सध्या शेतकरी अडचणीत असून दिवाळीपूर्वी सरकारचा मदत

करण्याचा निर्धार असल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील मौजा दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या गावांमध्ये भेट देऊन शेतपिकांच्या नुकसानीची त्यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

---------------------------------

धम्मचक्र प्रवर्तन

69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त 2 ऑक्टोबर रोजी धम्मचक प्रवर्तन दिनाच्या मुख्य सोहळ्या प्रसंगी सायंकाळी 6 वाजता होणाऱ्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जून ससाई तर प्रमुख पाहुणे म्हणून धम्म लर्निंग सेंटर सारनाथ चे भदंत चंदीमा थेरो, बोध गया महाविहार मुक्ती आंदोलनातील भंते विनाचार्य, हरियाणा सरकारचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.राजशेखर वुंद्रु उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आज स्मारक समितीचे सचिव डॉ.राजेंद्र गवई यांनी दीक्षाभूमी नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. दीक्षाभूमीवरील अनुयायांना थांबण्याकरिता शाळा उपलब्ध करून देण्याकरिता सर्व संबंधित शिक्षणाधिकारी, महानगरपालिका तसेच दरवर्षीप्रमाणे नागपूर येथील सर्व बुद्ध बुद्धविहार कमिटींना विनंती करण्यात आल्याची माहिती गवई यांनी दिली. 30 सप्टेंबर पासून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम दीक्षाभूमीवर चालू होणार आहे.

---------------------------------

सेवापर्व

सेवा आणि सुशासन या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वाटचाल करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सतत कार्यरत आहे. सेवा पर्व या मालिकेत आज आपण भारतीय रेल्वेतल्या सुधारणांबद्दल जाणून घेणार आहोत....

***(होल्ड बाईट)***

***(व्हीसी- नम्रता फलके)***

***(गेल्या दशकभरात रेल्वेमधे मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाल्या असून रेल्वे ही देशाच्या प्रगतीची वाहक झाली आहे. प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि उत्तम अनुभव देण्याचा प्रयत्न रेल्वे करत आहे. रेल्वेने काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचा भारत जोडला गेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतंच उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला मार्गाचं उद्घाटन केलं, त्यावेळी ते म्हणाले......***

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २० सेकंद)***

*आज "वादी-ए-कश्मीर" भारत के रेल नेटवर्क से जुड़ गई है माँ भारती का वर्णन करते हुए हम श्रद्धाभाव से कहते आए हैं, कश्मीर से कन्याकुमारी ये अब रेलवे नेटवर्क के लिए भी हकीकत बन गया है।*

*(अमृत भारत ट्रेन आणि नमो भारत जलद ट्रेन प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. येत्या दोन वर्षांत २०० नव्या वंदे भारत गाड्या, शंभर अमृत भारत गाड्या, ५० नमो भारत जलद गाड्या आणि १७ हजार ५०० साधारण गाड्या प्रवाशांसाठी सज्ज होणार आहेत. अमृत भारत स्थान योजने अंतर्गत १३०० स्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला. प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वसनीय रेल्वे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी सरकार राष्ट्रीय रेल्वे योजना राबवणार आहे.)*

----------------------------------

कामठी उड्डाण पूल - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

भारतासह बाहेरच्या देशांमध्ये ड्रॅगन टेम्पलबद्दल प्रचंड आकर्षण आहे. हजारो पर्यटक आणि श्रद्धाळू ड्रॅगन टेम्पलला भेट देत असतात. या सर्वांसाठी आता नवीन रेल्वे उड्डाणपूल सोयीचा ठरणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला. केंद्रीय रस्ते निधीमधून कामठी-घोरपड-लिहीगाव रस्त्यावर बांधलेल्या ७०८.६६ मीटरच्या रेल्वे उड्डाण पुलाचं लोकार्पण गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. याशिवाय कामठीच्या सौंदर्यात भर पाडण्यासाठी एक प्रशस्थ फोर लेन महामार्ग तयार करण्याचं त्यांनी प्रस्तावित केलं -

*(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी - २२ सेकंद)*

*या ड्रॅगन टेंपलच्या आता दसऱ्याचा जो कार्यक्रम आहे त्यावेळी आता येणाऱ्या लोकांची सोय या पुलाच आज उद्घाटन झालं, त्यामुळे होणार आहे. मेट्रोच्या निमित्ताने आता कामठी शहरातला जो मुख्य रस्ता आहे हा बावनकुळे साहेब फोर लेन कॉंक्रीट रोड, मेट्रोच्या पुलाच्या खाली दोन्ही बाजूला फुटपाथ शक्य असेल तर सर्व्हिस रोड उत्तम लाइट लॅंडस्केपिंग करून तर हा रस्ता मला कामठीच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.*

नागपूर-जबलपूर आणि कामठी-गुमथळा-कुही तसेच नागपूर-कोलकता मार्ग जोडले जातील. त्यामुळे नागपूर शहर, कामठी शहर आणि कामठी ग्रामीण भागाची वाहतूक सुरळीतपणे होईल असंही गडकरी म्हणाले.

----------------------------------

संविधान सत्याग्रह

दीक्षाभूमीपासून सेवाग्राम आश्रम पर्यंतच्या संविधान सत्याग्रह पदयात्रेला महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सुरुवात झाली. संविधान वाचवण्यासाठी तसेच भारतीय नागरीतत्वाला पाठबळ देण्यासाठी ही संविधान सत्याग्रह यात्रा काढण्यात येत असल्याचं तुषार गांधी माध्यमांशी बोलतांना म्हणाले. या पदयात्रेत काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

---------------------------------

डॉ.नितीन राऊत/कमलताई गवई

यावर्षी नागपूरात आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजया दशमी उत्सवाचं निमंत्रण काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी नाकारलं आहे. आपण संघाच्या विचारांना मानत नाही, मी तर दीक्षाभूमीचा कार्यकर्ता आहे, असं राऊत यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीला सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या आई उपस्थित राहणार असल्याच्या संदर्भात आज डॉक्टर राजेंद्र गवई यांनी माध्यमांशी संवाद साधला:

***(होल्ड बाईट- २५ सेकंद)***

***पाच तारखेला संघाचा कार्यक्रम अमरावतीत होत आहे आणि त्या कार्यक्रमाला आईसाहेबांना निमंत्रण भेटलेला आहे, आणि आई साहेबांनी ते निमंत्रण स्वीकारले आहे. आदरणीय दिवंगत रिपब्लिकन पक्षाचे नेते बॅरीष्ठर राजाभाऊ खोब्रागडे हे सुद्धा उपस्थित राहिलेले आहेत मुख्य कार्यक्रमांना नागपूरच्या दादासाहेब गवई सुद्धा उपस्थित राहिलेले आहेत त्यामुळे आई साहेबांना त्याच निमंत्रण दिलेलं आहे आणि तसंही गवई परिवाराचे पक्ष विरहित असे संबंध आहे.***

---------------------------------

पदवीधर मतदार संघ

नागपूर पदवीधर मतदार संघामध्ये सध्याचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांची अहर्ता दिनांक 26 डिसेंबर 2025 ला संपत असल्याने या मतदारसंघांमध्ये नव्याने निवडणूक घेण्यात येईल. यासाठी नवीन मतदारनोंदणी सुरु झाली असल्याची माहिती आज विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली. पदवीधर मतदारसंघासाठी नागपूर शहरात वास्तव्य असलेल्या पदवीधराला पदवी पास केल्याच्या किमान तीन वर्षानंतर या मतदारसंघासाठी मतदार म्हणून अहर्ता धारण करता येईल असं त्यांनी सांगितलं. या निवडणुकीमध्ये मतदार नोंदणीसाठी फॉर्म 18 स्वीकारण्याची अंतिम तारीख 6 नोव्हेंबर पर्यंत असून प्रारूप यादी 25 नोव्हेंबरला प्रकाशित होईल. तर 30 डिसेंबरला अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात

येईल. ज्या मतदारांनी 2020 ला देखील मतदान केलं असेल त्यांना नव्यानं नोंदणी करणे आवश्यक असेल असंही बिदरी यांनी स्पष्ट केलं .

---------------------------------

अर्ज भरण्यास मुदतवाढ

राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास अडचण येत असल्याने दिनांक २० ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले.

---------------------------------

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, अशा गंभीर परिस्थितीमध्ये देखील एस टी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचं एका गोपनीय अहवालामध्ये निष्पन्न झालं आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून, कर्तव्यात हलगर्जीपणा दाखवणाऱ्या आगार प्रमुखांवर तातडीने कारवाई करण्यात यावी असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहे.

---------------------------------

हवामान

आज आणि उद्या विदर्भातील हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

---------------------------------